*आज मात्र ऑफिसमधून निघाल्यापासून कोणताही प्लॅन न ठरवता तो तसाच गाडी चालवत निघाला होता, आणि त्याच गाडीतून बाहेरचं जग अचानक आत शिरलं होतं. ज्या जगाचा मागची काही वर्षं त्याला विसरच पडल्यासारखा झाला होता, त्यानं अचानक आदित्यला आपल्या अस्तित्वाची जाणीव करून दिली होती. आपण या विस्तीर्ण जगाचा एक अतिशय नगण्य हिस्सा आहोत हे त्याला जाणवलं होतं, पण आश्चर्य म्हणजे ही जाणीव त्याला त्रास देणारी नव्हती, तर उलट सुखावणारी, मोकळं करणारी होती!*

अमेरिकन कॉर्पोरेट लॅडर झपाझप चढण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या एका तरुणाचा एक प्रवास त्याला कसं बदलतो, याचं वर्णन करणारी कथा.